# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१.**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेस नोट ३७९-२२** **दिनांक ०९/१२/२०२२**

## घरफोडी करणाऱ्या महिलेस अटक करुन ७,३०,०००/- रुपये किंमतीचा मुददेमाल हस्तगत.

## आचोळे पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

दिनांक ०७/११/२०२२ रोजी रात्रौ १०.३० वा. ते दिनांक २३/११/२०२२ रोजी रात्रौ ०८. ३० वा. च्या दरम्यान फिर्यादी नामे सौ. दिव्या सुरेश पटेल, वय ३५ वर्षे, रा. रु.नं. २०२, जी विंग, रश्मिगार्डन, एव्हरशाईन सिटी, नालासोपारा पुर्व यांच्या राहत्या घरात कोणीतरी अज्ञात चोरटयाने प्रवेश करुन त्यांच्या घरातील १,००,०००/- रु.किंमतीचे सोन्याचे दागिने व ८,३६,०००/- रु. रोख रक्कम अशी एकूण ९,३६,०००/- रुपये किंमतीच्या मुददेमालाची चोरी केल्याबाबत फिर्यादी यांनी आचोळे पोलीस ठाणे येथे समक्ष हजर राहून दिलेल्या फिर्यादीवरुन दिनांक २६/११/२०२२ रोजी गुन्हा रजि.नं. ५८७/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३८०, ४५४, ४५७, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

नमूद गुन्हयाचे गांभीर्य लक्ष्यात घेवून सदर गुन्हा उघडकीस आणण्याकरीता मा. वरिष्ठांनी गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांना सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाच्या घटनास्थळावरील तसेच आजुबाजुचे परीसरातील १०० हुन अधिक सी.सी.टी.व्ही. फुटेज तपासले. परंतु, गुन्हा उघडकीस आणण्याच्या दृष्टीने काही उपयुक्त माहिती मिळून न आल्याने फिर्यादी राहत असलेल्या बिल्डींगमधील रहिवाशांकडे व फिर्यादी यांचेकडे चौकशी करुन संशयित इसमांच्या प्राप्त मोबाईल क्रमांकाचे तांत्रिक विश्लेषण करुन आरोपी नामे कुमारी हर्षीता उदयशंकर गुप्ता, वय २३ वर्षे, व्यवसाय गृहिणी, रा. रश्मी गार्डन, एव्हरशाईन लास्ट स्टॉप, नालासोपारा पुर्व हिस ताब्यात घेण्यात आले. तिचेकडे गुन्हयाच्या अनुषंगाने सखोल चौकशी करता तिने तिचा मित्र विधीसंघर्ष बालक याचे मदतीने नमूद गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने तिस दिनांक ०७/१२/२०२२ रोजी नमूद गुन्हयात अटक करुन तिच्याकडून गुन्हयात चोरी केलेले ४ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने, चोरीच्या रक्कमेतुन खरेदी केलेला आयफोन, के.टी.एम.मोटर सायकल, फर्निचर, फ्रिज अशा महागडया वस्तु तसेच ४,३०,०००/- रुपये रोख रक्कम असा एकुण ७,३०,०००/- रुपये किंमतीचा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, श्री. चंद्रकांत जाधव, सहा.पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली आचोळे पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. चंद्रकांत सरोदे, पोलीस निरीक्षक श्री. सुधीर गवळी (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण शाखेचे स.पो.नि. यशपाल सुर्यवंशी, पो.उप.निरी. सुहास म्हात्रे, सहा.फौजदार राजेश काळपुंड, पो.हवा. दत्तात्रय दाईंगडे, पोशि बालाजी संगमे, कपील बंडगर, विनायक कचरे यांनी उत्कृष्टपणे पार पाडली आहे.

----oooo----